प्रेसनोट दि. १९/०७/२०१९

**“खडकीचा मटका किंग म्हणून प्रसिध्द असलेला बबलू ऊर्फ जॉन नायर याच्या जुगार अड्डा व पत्त्यांचे क्लबवर गुन्हे शाखा,युनिट-०४ कडून छापेमारी:एकूण १९ आरोपींना केली अटक.”**

मा.पोलीस आयुक्त,श्री.डॉ.के.व्यंकटेशम्, पुणे शहर यांनी पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयामध्ये चालणा-या अवैध धंदयावर कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबवून समूळ उच्चाटन करणेबाबत पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेचे सर्व अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

मा.अप्पर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.अशोक मोराळे व मा.पोलीस उपआयुक्त,गुन्हे श्री.शिरीष सरदेशपांडे यांना माहिती मिळाली की,खडकी येथील प्रसिध्द मटका किंग बबलू ऊर्फ जॉन नायर हा सक्रिय असून तो खडकी व बोपोडी परिसरामध्ये लपून छपून मटका व पत्त्यांचा क्लब चालवत आहे,वगैरे माहिती मिळाल्यानंतर सदरबाबत कारवाई करणेबाबत युनिट-०४ चे प्रभारी -पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांना आदेशित करण्यात आलेले होते.

सदर आदेशाचे अनुशंगाने गुन्हे शाखा,युनिट-०४ चे पोलीस निरीक्षक मा.अंजुम बागवान व इतर अधिकारी व कर्मचारी यांनी दि.१७/०७/२०१९ रोजी माहिती काढून खडकी येथे एकाच दिवशी बबलूशेठ ऊर्फ जॉन नायर याचे दोन जुगार अड्डयावर छापेमारी केली. **मध्यरात्री देशी दारुचे दुकानाचे मागे,बोपोडी या ठिकाणी पत्त्यांचा क्लब चालू असलेल्या ठिकाणी छापा घालून एकूण-७७७६०/-रुपये रोख रक्कमेसह इतर जुगाराचे साहित्यासह एकूण १५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.तसेच त्याच दिवशी दिवसा साई मंदिराशेजारी,रेल्वे भिंतीलगत दिवसा घातलेल्या छाप्यामध्ये मटका जुगाराच्या चिठ्ठया व रोख रक्कमेसह एकूण-२४७०/- रुपयाचा मुद्देमाल व एकूण ०४ आरोपींना अटक केलेली आहे.छापेमारीमध्ये एकूण ८०२३०/- रुपयांचा मुद्देमाल व एकूण १९ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.अशा प्रकारे मटकाकिंग बबलूशेठ ऊर्फ जान नायर याचे एकाच दिवशी ०२ जुगार अड्डयावर छापेमारी करून गुन्हे शाखा,युनिट-०४ ने कारवाई केलेली आहे.**

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.अशोक मोराळे,पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री.शिरीष सरदेशपांडे,सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे-२) श्री.भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.अंजुम बागवान,पोलीस उपनिरीक्षक श्री.विजय झंजाड,पोलीस उपनिरीक्षक श्री निलेश महाडीक व पोलीस कर्मचारी अब्दुल सय्यद,शंकर पाटील,राजू मचे,सचिन ढवळे,रमेश चौधर,निलेश शिवतरे,सुरेंद्र साबळे यांनी केलेली आहे.